# नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र या संस्थेची नियमावली

## बृहन्मुंबई महानगरपालिका

एप्रिल २०२५

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | पृष्ठ क्र. ३ |
| २ | नियमावली क्रमांक : १ | पृष्ठ क्र. ५ ते १९ |
| ३ | नियमावली क्रमांक : २ | पृष्ठ क्र. २१ ते ५३ |
| ४ | नियमावली क्रमांक : ३ | पृष्ठ क्र. ५५ |
| ५ | नियमावली क्रमांक : ४ | पृष्ठ क्र. ५७ |
| ६ | नियमावली क्रमांक : ५ | पृष्ठ क्र. ५९ |
| ७ | नियमावली क्रमांक : ६ | पृष्ठ क्र. ६१ ते ६३ |
| ८ | नियमावली क्रमांक : ७ | पृष्ठ क्र. ६५ |
| ९ | नियमावली क्रमांक : ८ | पृष्ठ क्र. ६७ |
| १० | नियमावली क्रमांक : ९ | पृष्ठ क्र. ६९ ते ७१ |
| ११ | नियमावली क्रमांक : १० | पृष्ठ क्र. ७३ ते ७७ |
| १२ | नियमावली क्रमांक : ११ | पृष्ठ क्र. ७९ |
| १३ | नियमावली क्रमांक : १२ | पृष्ठ क्र. ८१ |
| १४ | नियमावली क्रमांक : १३ | पृष्ठ क्र. ८३ |
| १५ | नियमावली क्रमांक : १४ | पृष्ठ क्र. ८५ |
| १६ | नियमावली क्रमांक : १५ | पृष्ठ क्र. ८७ |
| १७ | नियमावली क्रमांक : १६ | पृष्ठ क्र. ८९ |
| १८ | नियमावली क्रमांक : १७ | पृष्ठ क्र. ९१ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## **नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र**

**प्रस्तावना**

कायदा व न्याय मंत्रालय
(वैधानिक विभाग)
नवी दिल्ली, २१ जून २००५ / ज्येष्ठ ३१ शके १९२७ रोजी

खाली नमूद केलेला अधिनियम दि.१५ जून २००५ रोजी राष्ट्रपतींच्या अनुमतीने संसदेत प्राप्त झाला आणि सामान्य माहितीसाठी तो येथे प्रसिध्द होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
(२००५ चा क्र.२२) (१५ जून २००५)

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग गठित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, भारताच्या संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत;

आणि ज्याअर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधाना तसेच, शासनांचे कामकाज कार्यक्षमरीत्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनीयता राखणे, या बाबींनाही बाध येण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखताना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, आता, माहिती मिळविण्याची इच्छा असणा-या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे;

१५ जून २००५ च्या भारत सरकारच्या या माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमानुसार, **नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र** या विभागातर्फे मॅन्युअल तयार करुन सविनय सादर करीत आहोत.